आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

२ डिसेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आजही दिवसभरासाठी तहकूब /लोकसभेच्या सभापतींनी घेतलेल्या बैठकीत, कामकाज सुरळीत चालू देण्याबाबत विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांची सहमती

- महाराष्ट्रात भाजपा विधीमंडळ पक्षनेता निवडीसाठी केंद्रीय निरीक्षक म्हणून भाजपाकडून विजय रुपाणी आणि निर्मला सीतारामन यांची नियुक्ती / येत्या बुधवारी भाजपा विधिमंडळ पक्षाची बैठक

- उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्या मुंबई दौऱ्यावर

**आणि**

- पुरुष हॉकी कनिष्ठ आशिया चषक स्पर्धेत भारत आणि मलेशिया यांच्यात उद्या उपांत्य सामना

**<><><><><>**

अदानी समूहाचं कथित लाचखोरी प्रकरण तसंच संभल हिंसाचार यांच्यासह विविध मुद्द्यांवर विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे आज सलग पाचव्या दिवशीही संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

लोकसभेत आज कामकाज सुरू झाल्यानंतर कॉँग्रेस, समाजवादी पार्टी, द्रमुक आणि इतर पक्षाच्या नेत्यांनी घोषणाबाजी करायला सुरुवात केली. सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास घ्यायचा प्रयत्न केला. दरम्यान विरोधकांनी आपल्या मुद्द्यांवरून सभापतींना स्थगन प्रस्ताव सादर केला, तो बिर्ला यांनी फेटाळून लावला. सभापतींनी वारंवार चर्चेची विनंती करूनही गदारोळ सुरूच राहिल्यानं

लोकसभेचं कामकाज आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब झालं.

राज्यसभेतही विरोधकांनी अदानी, संभल तसंच मणिपूर या विषयांवरून स्थगन प्रस्ताव सादर केला. मात्र, अध्यक्ष जगदीप धनखड यांनी तो फेटाळला. त्यानंतर विरोधकांचा गदारोळ कायम राहिल्यानं राज्यसभेचं कामकाजही दिवसभरासाठी तहकूब झालं.

**<><><><><>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सुरू असलेला गोंधळ थांबवण्यासाठी लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी आज दुपारी संसद भवनात विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांची बैठक घेतली. यावेळी बिर्ला यांनी सर्व नेत्यांना सभागृहाचं कामकाज सुरळीतपणे चालवण्याची विनंती केली. त्यावर सर्व नेत्यांनीही यासाठी सहमती दर्शवली. या बैठकीला काँग्रेसचे गौरव गोगोई, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, टीडीपीचे लवू श्रीकृष्ण देवरायालू, डीएमकेचे टी. आर. बालू, राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, सपाचे धर्मेंद्र यादव, जदयूचे दिलेश्वर कामैत, राजदचे अभय कुशवाह, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत उपस्थित होते.

**<><><><><>**

पेट्रोल-इथेनॉल मिश्रणामुळे नोव्हेंबर २०२३ ते ऑक्टोबर २०२४ पर्यंत २८ हजार ४०० कोटी रुपयांपेक्षा जास्त परकीय चलनाची बचत झाली आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी आज राज्यसभेत ही माहिती दिली. डिझेलमधे इथेनॉलचं मिश्रण करण्यासाठी सरकारनं कोणताही कार्यक्रम हाती घेतलेला नाही, असं त्यांनी सांगितलं. मात्र डिझेलमधे ५ टक्के इथेनॉल मिसळून कार्बन उत्सर्जन आणि कामगिरी पडताळण्यासाठी इंडियन ऑईल

कॉर्पोरेशननं २०२२-२३ मधे पथदर्शी मूल्यांकन केलं होतं, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

महाराष्ट्रात सरकारस्थापनेच्या दृष्टीनं, भाजपा विधीमंडळ पक्षनेता निवडीसाठी केंद्रीय निरीक्षक म्हणून भाजपाच्या संसदीय मंडळानं गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री  निर्मला सीतारामन यांची नेमणूक केली आहे.

भारतीय जनता पार्टीच्या विधिमंडळ पक्षाची बैठक येत्या ४ डिसेंबरला होणार असून त्यानंतर मुख्यमंत्रीपदासाठी औपचारिक घोषणा होण्याची शक्यता आहे.

काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आजच्या सर्व बैठका आणि कार्यक्रम रद्द केल्याचं सूत्रांनी सांगितलं.

दरम्यान शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांना उपमुख्यमंत्रिपद मिळणार असल्याचं वृत्त निराधार असल्याचं श्रीकांत शिंदे यांनी समाजमाध्यमातून स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय उद्योग क्षेत्रात विविध पातळ्यांवर गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण होत असून त्यावर जागतिक पातळीवरच्या भागीदारीची गरज आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज तर्फे आज नवी दिल्लीत आयोजित भागीदारीविषयक परिषदेत ते बोलत होते. जगात सर्वच देशांना आव्हानं उभी राहत असून त्यावर एकेकट्यानं मात करणं अवघड आहे, असं ते म्हणाले.

युक्रेन रशिया युद्ध, अमेरिका आणि चीन दरम्यानचा व्यापारी संघर्ष, चलनवाढ, आणि कर्ज अशा विविध घटनांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा उल्लेख त्यांनी केला. जागतिक पुरवठा साखळी, नवोन्मेष, आणि तंत्रज्ञान या क्षेत्रात भारत

जगाचं नेतृत्व करेल, असा विश्वास व्यक्त करुन त्यांनी जगभरात पसरलेल्या भारतीय समुदायाच्या योगदानाचा गौरव केला.

<><><><><>

उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्या मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या शतकमहोत्सवी समारंभाला ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते शतकमहोत्सवी स्तंभाचं उद्घाटन होईल. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान हेदेखील या कार्यक्रमाला संबोधित करणार आहेत. संस्थेच्या शतकमहोत्सवी वर्षाचं औचित्य साधून ‘अमृतकाळात कापसावरची उत्पादनानंतरची प्रक्रिया’ या विषयावरच्या परिसंवादाचं आयोजनही करण्यात आलं आहे.

<><><><><>

पुरुष हॉकी कनिष्ठ आशिया चषक स्पर्धेत भारत आणि मलेशिया यांच्यात उद्या उपांत्य फेरीचा सामना होणार आहे. ओमानमध्ये मस्कत इथं ओमान स्टेडियमवर संध्याकाळी साडे आठ वाजता सामन्याला सुरुवात होईल. उपांत्य फेरीतला दुसरा सामना पाकिस्तान आणि जपान यांच्यात उद्या होणार आहे. तर या स्पर्धेतला अंतिम सामना ४ डिसेंबर रोजी होईल.

काल झालेल्या सामन्यात भारतानं दक्षिण कोरियाचा ८-१ असा पराभव केला. यात अर्शदीप सिंगनं हॅटट्रिक नोंदवली. तर अरैजीत सिंग हुंदल याने भारतासाठी दोन गोल केले.

<><><><><>

१९ वर्षाखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज अ-गटात भारताने जपानचा २११ धावांनी पराभव केला. संयुक्त अरब अमिरातीतल्या शारजाह स्टेडीयमवर झालेल्या या सामन्यात जपाननं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण

करण्याचा निर्णय घेतला. मात्र त्यानंतर भारतानं विजयासाठी दिलेलं ३४० धावांचं उद्दिष्ट गाठताना जपानचा डाव १२९ धावांवर आटोपला. अ -गटातल्या दुसऱ्या सामन्यात पाकिस्ताननं संयुक्त अरब अमिरातींच्या संघाला ६० धावांनी पराभूत केलं.

**<><><><><>**

जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय ग्रँडमास्टर डी. गुकेश आणि चीनचा डिंग लिरेन यांच्यातला आणखी एक सामना अनिर्णित राहिला. सलग तिसरा सामना बरोबरीत सुटल्यानं अंतिम फेरीत लिरेन आणि गुकेश यांचे प्रत्येकी ३ गुण झाले आहेत. दोन्ही खेळाडूंना अजूनही विजेतेपदासाठी प्रत्येकी साडेचार गुणांची आवश्यकता आहे. लिरेननं सलामीचा गेम जिंकला तर गुकेशनं तिसऱ्या गेममध्ये विजय मिळवला होता. दुसरा, चौथा आणि पाचवा हे तीन सामने बरोबरीत सुटले होते.

**<><><><><>**

भारतीय ऑलिपिंक संघटनेनं २०३६मध्ये ऑलिम्पिक खेळांच्या यजमानपदासाठी आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीशी बोलणी सुरू केली आहेत. गेल्या ऑक्टोबर महिन्यात या संबंधीचं पत्र जारी केलं आहे, अशी माहिती युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी आज लोकसभेत लेखी उत्तरात दिली.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात आज  भामरागड दलमची सदस्य असलेल्या एका नक्षल महिलेनं पोलिस आणि केंद्रीय राखीव दलासमोर आत्मसमर्पण केलं. ८ चकमकी, ३ खून आणि एका दरोड्याच्या गुन्ह्यात तिचा सहभाग होता. राज्य शासनानं  तिच्यावर २ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलं होते.

**गडचिरोली** जिल्ह्यात आजपासून सुरु झालेल्या नक्षलवाद्यांच्या पीएलजीए सप्ताहात पोलिसांच्या चोख बंदोबस्तामुळे दिवसभरात कोणतीही अनुचित घटना घडली नाही, अशी माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ४४५ अंकांची वाढ झाली, आणि तो ८० हजार २४८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १४५ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार २७६ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

येत्या दहा वर्षांत भारतीय नौदलात ९६ जहाज आणि पाणबुड्या सामील केल्या जातील असं नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी यांनी सांगितलं. ६२ जहाजं आणि एक पाणबुडी निर्माणाधिन असून पुढच्या वर्षापर्यंत प्रत्येक महिन्यात एक जहाज नौदलात सामील करून घेतलं जाईल असं त्रिपाठी म्हणाले. वार्षिक नौदल दिवसाच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर ते आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. ४ डिसेंबर रोजी ओदिशातल्या पुरी इथं नौदल दिवस साजरा केला जाईल. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती असेल, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

देशात अन्नप्रक्रिया क्षेत्राची क्षमता फार मोठी असून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत याला मोठी संधी असल्याचं प्रतिपादन केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योगमंत्री चिराग पासवान यांनी केलं आहे. पाटणा इथं या क्षेत्राशी संबंधित गुंतवणूकदारांच्या बैठकीत ते बोलत होते.

<><><><><>

महाराष्ट्रात, इयत्ता पाचवी आणि आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये ९ फेब्रुवारी या एकाच दिवशी पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाणार आहे.

या परीक्षेसाठी शाळा नोंदणी आणि विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी १७ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीपर्यंत मुदत देण्यात आली होती. आता विलंब शुल्क, अतिविलंब शुल्क आणि अति विशेष विलंब शुल्कासह ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज भरता येतील, असं राज्य परीक्षा परिषदेच्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, राज्यातल्या सर्व विभागांमधे तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली. सर्वात कमी किमान तापमान ब्रम्हपुरी इथं १४ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

//<><><><><>//